॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246

## OFFICE OF THE REGISTRAR

website: srtmun.ac.in
Email: registrar@srtmun.ac.in

आस्था/०२/२०२५–२६/ 90C

दिनांक ०९ ऑगष्ट, २०२५ 11

## — परिपत्रक —

प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुलांचे संचालक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख तसेच वर्ग–१ व वर्ग–२ अधिकारी यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, मागील ब-याच कालावधीपासून यु.जी.सी, केंद्र शासन, महाराष्ट्र शासन व त्यांच्या अधिनस्त कार्यालयाकडून मा. कुलगुरू महोदय/मा. प्र–कुलगुरू महोदय/कुलसचिव कार्यालयाकडे आलेला व्यवहार हा संबंधित विभागाच्या ई–मेल वर फॉरवर्ड केला जातो. काही विभाग हे अतिशय तत्परतेने अशा स्वरूपात फॉरवर्ड झालेले ई–मेल पाहून त्यावर कार्यवाही करतात. तथापि, काही विभाग हे वेळेवर ई–मेल पहात नाहीत आणि संबंधित कार्यालयास वेळेत माहिती प्राप्त होत नाही आणि मा. कुलगुरू महोदयांच्या कार्यालयात, मा. प्र–कुलगुरू महोदय तसेच कुलसचिव यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त न झाल्याची व ती तातडीने पाठविण्याची मागणी होत असते. कधी–कधी तर कुलसचिव यांच्या वैयक्तिक मोबाईलवर शासन कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी माहितीसाठी तगादा लावत असतात. ही बाब विद्यापीठ प्रशासनाच्या दृष्टिने योग्य नाही.

या बाबी वारंवार घडू नयेत म्हणून, सर्व संबंधित विभागांना सूचित करण्यात येते की, दिवसभरात वेळोवेळी आपल्या विभागाचा ई–मेल पाहण्यात यावा किंवा त्याची जबाबदारी विभागातील एका जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात यावी. जर ई–मेल पाहणारे अधिकारी/कर्मचारी रजेवर असतील तर त्यांच्याकडून ई–मेलचा पासवर्ड घेवूनच त्यांची रजा मंजूर करण्यात यावी. 'आमचा ई–मेल पाहिला नाही', 'संबंधित कार्यालयाकडून किंवा कुलसचिव कार्यालयाकडून पत्रव्यवहार/ई–मेलची प्रिंट आम्हाला मिळाली नाही' अशा बाबींची पुनरावृत्ती यापुढे घडणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यामुळे आपापल्या विभागाचा ई–मेल वेळोवेळी पाहून संबंधित पत्रव्यवहारावर विहित मुदतीच्या आत कार्यवाही करण्यात यावी.

कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी विद्यापीठाचा वेब–मेल (...........@srtmun.ac.in) वापरणे अनिवार्य आहे. यासंदर्भात जर काही अडचण असेल तर श्री. शिवलिंग पाटील, सिस्टिम एक्स्पर्ट यांच्याशी संपर्क साधून अडचण दूर करून घ्यावी.

(प्रा.(डॉ.) ज्ञानेश्वर दा. पवार)
प्र.कुलसचिव
कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रति,

(१) **संचालक/विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक संकुले/ प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.**
(२) **संचालक/विभाग प्रमुख, उपपरिसर, लातूर, परभणी, प्रस्तुत विद्यापीठ.**
(३) **प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ.**
(४) **समन्वयक, कै.श्री. उत्तमराव राठेड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ.**
(सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा)
(५) **सिस्टिम एक्स्पर्ट, प्रस्तुत विद्यापीठ** (प्रत संकेतस्थळावर ठेवण्यासाठी)

**प्रत माहितीस्तव —**

१ **मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.**
२ **मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.**

(प्रा.(डॉ.) ज्ञानेश्वर दा. पवार)
प्र.कुलसचिव
**कुलसचिव**
**स्वामी रामानंद तीर्थ**
**मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**